# अभंग - ज्ञानेश्वरी

## अध्याय पहिला

* आत्मरूपा तुज । करीं नमस्कार । तुझा जयजयकार । असो देवा ।।१।।
* ॐकारस्वरूपा । तूं चि सर्वां मूळ। व्यापोनि सकळ । राहिलासी ।।२।।
सर्व [१] सर्वातीत। तूं चि [२] सर्वात्मक । विषय तूं एक । * वेदांलागीं ।।३।।
'नेति नेति' ऐसें । बोलती ते वेद । स्वरूप [३] अगाध । तुझें देवा ।।४।।
जाणावयाजोगा । आपणा आपण । म्हणोनियां मौन । वेदांसी हि ।।५।।
आत्मरूपा देवा । तूं चि गणाधीश । बुध्दीचा प्रकाश । सकलांच्या ।।६।।
आतां ऐका ऐसें । म्हणे श्रोतयांस । निवृत्तीचा दास । ज्ञानदेव ।।७।।
पूर्ण [४] शब्दब्रह्म । गणेशाची मूर्ति । सजलीसे किती । मनोरम ।।८।।
वर्णरूप शोभे । शरीर निर्मळ। सौंदर्य सोज्ज्वळ। खुले तेथें ।।९।।
कैसी रसपूर्ण । देहाची ठेवण । प्रकटली खाण । लावण्याची ।।१०।।
वेगळाल्या * स्मृती । ते चि अवयव । सौंदर्याची ठेव । अर्थ-शोभा ।।११।।
अठरा * पुराणें । शोभती साचार । जणूं अलंकार । रत्नमय ।।१२।।
वेंचोनियां नाना । [५] प्रमेयांचे [६] मणी । पद्याचे कोंदणीं । बैसविले ।।१३।।
सहज सुंदर । शब्दांची रचना । वस्त्र तें चि जाणा । रंगदार ।।१४।।
साहित्याचा धागा । नाजूक अत्यंत । दिसे [७] ओतप्रोत । झळाळत ।।१५।।
काव्य - नाटकें तीं । जणूं घागऱ्या च । ऐसें वाटे [८] साच । निर्धारितां ।।१६।।
आणि अर्थ-ध्वनि । करी रुणझुण। हालतां चरण । गणेशाचे ।।१७।।
नाना प्रमेयांची । चातुर्यें गुंफण । करोनि पैंजण । घडिलासे ।।१८।।
योग्य [९] पदें हींच । तेथ रत्नें भलीं। जरी [१०] विलोकिलीं । सूक्ष्मदृष्टी ।।१९।।

---

* परिशिष्ट पहा. १ सर्वांच्या पलीकडील. २ सर्वांत भरून राहिलेला. ३ गूढ. ४ वेद. ५ सिद्धांतांची.
६ रत्नें. ७ सर्व बाजूंनीं. ८ खरोखर. ९ शब्द. १० पाहिलीं.

*व्यासादिक कवि- । श्रेष्ठांची जी मति । तो चि शेला कटीं । शोभतसे ।।२०।।
[१] नितांत निर्मळ । तयाचे पदर । झळकती सुंदर । अग्रभागीं ।।२१।।
*सहा शास्त्रें तीच । भुजांची आकृति । वेगळाले देती । [२] अभिप्राय ।।२२।।
म्हणोनियां हातीं । [३] आयुधें हि भिन्न । दाखवाया खूण । आपुलाली ।।२३।।
तर्क तो [४] परश । न्याय तो अंकुश । मोदक सुरस । वेदान्ताचा ।।२४।।
बौद्ध-वार्तिकांचें । जें का बौद्धमत । तो चि [५] छिन्न दंत । योगाहातीं ।।२५।।
मग सांख्यमत । तो चि [६] पद्महस्त । स्वभावें जो देत । वर-दान ।।२६।।
धर्मसूत्रें जीं का । धर्मसिद्धिप्रद । तो चि येथें सिद्ध । अभयहस्त ।।२७।।
निर्मळ विवेक । सरळ ती सोंड । जेथें महानंद । [७] स्व-सुखाचा ।।२८।।
संवाद तो दंत । दुजा शोभे संगें । समत्वाच्या योगें । शुभ्रवर्ण ।।२९।।
ज्ञानरूप भले । पहा सूक्ष्म डोळे । शोभती [८] आगळे । विघ्नेशाचे ।।३०।।
दोन हि *मीमांसा । ते चि दोन्ही कान । ऐसें माझें मन । सांगे मज ।।३१।।
गंडस्थलांतून । स्वभावें संतत । [९] बोधमदामृत । पाझरे जें ।।३२।।
तेथें मुनिजन । होवोनि भ्रमर । जाहले अमर । सेवितां तें ।।३३।।
मतें *द्वैताद्वैत । पावती ऐक्यातें । तुल्यबलें तेथें । गंडस्थलीं ।।३४।।
नाना तत्त्वार्थांचीं । सतेज पोंवळीं । कैसीं विराजलीं । गजाननीं ।।३५।।
*दशोपनिषदें । पुष्पें सुंगधित । नित्य उधळीत । [१०] ज्ञान-रेणू ।।३६।।
सहज सुंदर । मनोरम अति । शोभती मुकुटीं । पहा कैसीं ।।३७।।
अकार पाउलें । उकार उदर । दिसे मनोहर । विशालत्वें ।।३८।।
मकार तो [११] महा-। मंडलासारिखा । आकार [१२] आलेखा । मस्तकाचा ।।३९।।
अ उ म हे तिन्ही । होतां एकवट । ॐकार प्रकट । दिसूं लागे ।।४०।।
गुरुकृपें [१३] आदि-। बीज तें वंदिलें । जेथ सामावलें । शब्द-ब्रह्म ।।४१।।
आतां वंदितसें । देवी शारदेस । जिचा [१४] वाग्विलास । नित्य नवा ।।४२।।

---

१ अतिशय. २ मत. ३ हत्यारे. ४ परशु. ५ तोडलेला. ६ कमळासारखा हात. ७ आत्मसुखाचा.
८ विशेष. ९ बोधरूपी मद हेंच अमृत. १० ज्ञानरूपी परागकण. ११ मोठ्या वर्तुळासारखा.
१२. रेखाटा. १३ ॐकार. १४ भाषेचे खेळ.

चातुर्य- [१] वागर्थ-। कलेची स्वामिनी। विश्वासी मोहिनी। घालिते जी ।।४३।।
भवार्णवीं जेणें । तारियलें मज । तो श्रीगुरुराज । हृदयीं माझ्या ।।४४।।
म्हणोनियां प्रेम । वाटतसे फार । मज सारासार-। विचाराचें ।।४५।।
* पायाळूच्या डोळां । घालितां अंजन । पाहूं शके धन । भूमिगत ।।४६।।
किंवा * चिंतामणि । होतां हस्तगत । सर्व मनोरथ । सदा पूर्ण ।।४७।।
ज्ञानदेव म्हणे । तैसा पूर्णकाम । झालों घेतां नाम । निवृत्तीचें ।।४८।।
म्हणोनियां भावें । गुरु-नाम घ्यावें । कृतकृत्य व्हावें । जाणत्यानें ।।४९।।
वृक्षाचिया मूळीं । घालितां उदक । देखा शाखादिक । संतोषती ।।५०।।
किंवा भावें होतां । सागरीं सुस्नात । जैसीं घडतात । सर्व तीर्थें ।।५१।।
अमृताची गोडी । चाखिली जयानें । सेविले तयानें । सर्व रस ।।५२।।
तैसा भक्तिभावें । मियां वारंवार । केला नमस्कार । श्रीगुरूसी ।।५३।।
इच्छावें जें मनें । तें तें यथारुचि । पुरविता तो चि । म्हणोनियां ।।५४।।
आतां सावधान। ऐका श्रोतेजन । कथा जी गहन । भारताची ।।५५।।
विवेक-वृक्षांचें । अपूर्व उद्यान । कौतुकांची खाण । सकल हि ।।५६।।
सर्व सुखांचें जी । असे जन्म-स्थान । कीं महा-निधान । प्रमेयांचें ।।५७।।
नऊ हि रसांचा । परिपूर्ण देखा । [२] सुधा- सिंधु जी का । रसाळत्वें ।।५८ ।।
सर्व विद्यांचें जी । असे मूळस्थान । मोक्षाचें [३] निधान । प्रकटलें ।।५९।।
किंवा जी का सर्व । शास्त्रांसी आधार । धर्माचें माहेर । सकलहि ।।६०।।
शारदेच्या शोभा-। रत्नांचें भांडार । नातरी [४] जिव्हार । सज्जनांचें ।।६१।।
किंवा महाबुद्धी-। माजीं व्यासांचिया । देखा स्फुरोनियां । सरस्वती ।।६२।।
त्रिलोकामाझारीं । जाहली प्रकट । ऐशा सर्वश्रेष्ठ । कथारूपें ।।६३।।
काव्यराज नांव । म्हणोनि ह्या ग्रंथा । रसां रसाळता । येथोनी च ।।६४।।
पावली [५] शब्दश्री । येथें सत्-शास्त्रता । वाढली मृदुता । महा-बोधीं ।।६५।।
चातुर्य तें येथें । शाहणें जाहलें । प्रमेय नटलें । गोडपणें ।।६६।।
सुखाचें सौभाग्य । पोसलें ह्या ठायीं । थोरपणा येई । उचितासी ।।६७।।

---

१ शब्द व त्यांतील भाव.　२ अमृताचा सागर.　३ ठेव.　४ जीवनकला.　५ शब्दाचे सौंदर्य.

येथें माधुरीसी । आली मधुरता । तेविं सुरेखता । शृंगारासी ।।६८।।
कलेसी कौशल्य । प्राप्त झालें भलें । पुण्या तेज आलें । आगळें चि ।।६९।।
*जनमेजयाचे । म्हणोनि नि:शेष । हारपले दोष । अनायासें ।।७०।।
पाहतां क्षणैक । रंगासी आगळें । तेज तें चढलें । [1] सुरंगाचें ।।७१।।
तेविं येथोनी च । थोर भलेपणा । लाधलासे जाणा । सद्‌गुणांसी ।।७२।।
उजळे त्रैलोक्य । सूर्य-प्रकाशांत । *व्यास- मति-व्याप्त । विश्व तैसें ।।७३।।
चोखाळोनि भूमि । पेरियलें बीज । विस्तारे सहज । जैशा रीती ।।७४।।
यथारुचि तैसे । स्वभावें सर्वार्थ । झाले प्रफुल्लित । भारतीं ह्या ।।७५।।
किंवा नगरांत । रहावया जावें । मग सभ्य व्हावें । जिया परी ।।७६।।
तैसें व्यासोक्तीचें । तेज प्रकटलें । तेणें उजळलें । सर्व कांहीं ।।७७।।
तारुण्यीं बहर । दिसे आगळाच । स्त्रियांअंगीं साच । सौंदर्याचा ।।७८।।
ना तरी [2] वसंतीं । प्रकटते ठेव । उद्यानीं अपूर्व । वनश्रीची ।।७९।।
नाना अलंकारीं । नटोनि सुवर्ण । दावी बरवेपण । आगळें चि ।।८०।।
तैसें व्यासोक्तीनें । होतां अलंकृत । होय शोभा प्राप्त । कोणातें हि ।।८१।।
म्हणोनियां वाटे । इतिहासें काय । घेतला आश्रय । भारताचा ! ।।८२।।
[3] प्रतिष्ठा संपूर्ण । लाभावी म्हणोन । अंगीं लीनपण । धरोनियां ।।८३।।
अठरा हि पुराणें । आख्यानांचे द्वारा । येथें आलीं घरा । भारताच्या ।।८४।।
देखा जें जें महा–। भारतीं नाढळे । शोधितां न मिळे । त्रैलोक्यीं तें ।।८५।।
म्हणोनियां ऐसें । बोलती यथार्थ । असे * व्यासोच्छिष्ट । जगत्रय ।।८६।।
ऐका परमार्था । जी का जन्म-स्थान । सर्वां रसीं पूर्ण । जगामाजीं ।।८७।।
ऐसी सर्वोत्तम । शुद्ध अनुपम । जी का [4] मोक्ष-धाम । अद्वितीय ।।८८।।
* वैशंपायन तो । मुनि तीच कथा । सांगे नृपनाथा । जनमेजया ।।८९।।
जो का भारताचा । सुंगध-पराग । विख्यात प्रसंग । गीतानामें ।।९०।।
यादवांचा राणा । प्रभु कृष्णनाथ । संवादला जेथ । अर्जुनाशीं ।।९१।।
व्यासें मंथोनियां । वेदांचा सागर । काढिलें अपार । [5] नवनीत ।।९२।।

---

१ उत्तम रंगाचें. २ वसंत ऋतूंत. ३ सन्मान. ४ मोक्ष लाभण्याची जागा. ५ लोणी.

ज्ञानाग्नीच्या योगें । कढवितां विवेकें । पावे [१] परिपाकें । साजूकता ।।९३।।
इच्छिती विरक्त । भोगिती जें संत । ज्ञाते रमती जेथ । * सोऽहंभावें ।।९४।।
करावें श्रवण । जें का भक्तजनीं । जें का त्रिभुवनीं । आदिवंद्य ।।९५।।
बोलिलें तें थोर–। भारताचें सार । प्रसंगानुसार । * भीष्मपर्वीं ।।९६।।
वाखाणिती व्यास। शिव-ब्रह्मदेव । भगवद्गीता नांव । सुविख्यात ।।९७।।
सेविती जें नित्य । * सनकादिक मुनी । विनम्र होवोनि । अत्यादरें ।।९८।।
शरद् ऋतूमाजीं । चंद्रकलेंतील । कण जे कोमल । अमृताचे ।।९९।।
करोनियां मन । [२] मृदुल आपुलें । * चकोराचीं पिलें । वेंचिती ते ।।१००।।
तैसी च ही अति । हळुवारपणें । कथा श्रोतृजनें । अनुभवावी ।।१०१।।
मूकपणें येथें । करावा संवाद । घ्यावा रसास्वाद । * अतींद्रिय ।।१०२।।
बोलाचिया आधीं । प्रमेयाची खूण । घ्यावी आकळून । [३] यथार्थत्वें ।।१०३।।
घेवोनि पराग । [४] भृंग जैसे जाती । परि तें नेणती । पद्म-दळें ।।१०४।।
त्या च परी व्हावी । येथें कुशलता । प्रेमें हा सेवितां । गीता-ग्रंथ ।।१०५।।
चंद्रोदयीं त्यासी । देई आलिंगन । स्व-स्थानीं राहोन । [५] कुमुदिनी ।।१०६।।
कैशा परी घ्यावा । प्रीतीचा संभोग । जाणे सांगोपांग । तीच एक ।।१०७।।
तैसा तो चि जाणे । तत्त्वतां गीतार्थ । गंभीर प्रशांत । चित्त ज्याचें ।।१०८।।
अहो ग्रंथाचें ह्या । करावें श्रवण । पंक्तीसी बैसोन । पार्थाचिया ।।१०९।।
ऐशा योग्यतेचे । तुम्ही संतजन । द्यावें अवधान । कृपाबुद्धी ।।११०।।
तुमचें हृदय । सखोल म्हणोनि । पायीं विनवणी । सलगीची ही ।।१११।।
ऐकोनियां जैसा । बालकाचा बोल । प्रेमें येई डोल । मायबापां ।।११२।।
तैसा तुम्हीं मातें । आपुला लेखिला । अंगीकार केला । संतजनीं ।।११३।।
म्हणोनि जें उणें । साहाल तें सुखें । कासया हें मुखें । विनवावें ।।११४।।
परी [६] आगळीक । आणिक ती येथ । पाहें मी गीतार्थ । कवळाया ।।११५।।
ऐका प्रभो तुम्हां । संत श्रोते जनां । करितों प्रार्थना । ह्या चि लागीं ।।११६।।
हें तों अनावर । न झाला विचार । वायां चि हा धीर । केला येथें ।।११७।।

---

* परिशिष्ट पहा. १ कढल्यामुळे. २ हळुवार. ३ अचूकपणें. ४ भुंगे. ५ चंद्रविकासी कमळ. ६ अपराध.

नाहीं तरी देखा । प्रकाशतां सूर्य । काजव्याची काय । शोभा तेथें ॥११८॥
किंवा चोंचीनेंच । [१] अब्धि आटवाया । [२]प्रवर्तली वायां । *टिटवी जैसी ॥११९॥
नेणता मी तैसा । असोनि सर्वथा । सांगाया गीतार्था । सिद्ध झालों ॥१२०॥
ऐका आकाशातें । [३] कवळूं पहावें । तरी मोठें व्हावें । त्याहुनी हि ॥१२१॥
म्हणोनि हें माझ्या । योग्यतेबाहेर । [४] आघवें [५] साचार । पाहूं जातां ॥१२२॥
अहो गीतार्थाचें । काय थोरपण । स्वयें विवरून । दावी शंभु ॥१२३॥
जेथ ती भवानी । पावोनी आश्चर्य । विचारितां काय । बोले तिज ॥१२४॥
देवी तुझें रूप । नाकळे गे जैसें । नित्य नवें तैसें । गीता-तत्त्व ॥१२५॥
* योगनिद्रेमाजीं । जयाचा कीं * घोर । वेदार्थ-सागर । रूप झाला ॥१२६॥
तो चि सर्वेश्वर । बोलिला प्रत्यक्ष । तत्त्व हें * अलक्ष्य । अर्जुनाशीं ॥१२७॥
ऐसें जें [६] गहन । वेदां जेथें मौन । तेथें मी अजाण । काय बोलूं ? ॥१२८॥
अपार हें सार । कैसें आकळावें । कोणें [७] धवळावें । भानु-तेज ॥१२९॥
[८] मशकानें कैसा । आकाशाचा प्रांत । धरावा मुठींत । सांगा बरें ॥१३०॥
परी मज येथें । आधार तो एक । म्हणोनि निःशंक । बोलतसें ॥१३१॥
ज्ञानदेव म्हणे । माझा पाठीराखा । निवृत्ति तो देखा । गुरुराव ॥१३२॥
एऱ्हवीं मी एक । अज्ञान बालक । झाला अविवेक । जरी येथें ॥१३३॥
तरी संतकृपा–। [९] दीपक [१०] सोज्ज्वळ । तेणें चि सबळ । केलों आतां ॥१३४॥
अहो लोहाचें हि । होतसे सुवर्ण । सामर्थ्य तें पूर्ण । * परिसाचें ॥१३५॥
किंवा मृतातें हि । लाभे सजीवता । तया मुखीं जातां । अमृत तें ॥१३६॥
जरी का [११] वाग्देवी । सरस्वती भेटे । तरी वाचा फुटे । मुक्यातें हि ॥३७॥
* वस्तुसामर्थ्याचें । बळ हें केवळ । नसे हो नवल । येथें कांहीं ॥१३८॥
जयातें लाभली । * कामधेनु माता । सर्व कांहीं हाता । येई त्याच्या ॥१३९॥
तैसा श्रीसमर्थ । म्हणोनि हा ग्रंथ । रचावया हात । घातला मीं ॥१४०॥
तरी श्रोतेजन । येथें जें जें न्यून । तें तें घ्यावें पूर्ण । करोनियां ॥१४१॥

---

* परिशिष्ट पहा. १ समुद्र. २ आरंभ करती झाली. ३ कवटाळूं. ४ सगळें. ५ खरोखर.
६ कळावयास कठिण. ७ उजळा द्यावा. ८ डांसाने. ९ दिवा. १० तेजस्वी. ११ वाणीची देवता.

आणि जें अधिक । घ्यावें तें मानोनि । ऐसी विनवणी । माझी तुम्हां ।।१४२।।
बाहुली ती नाचे । जैसी *सूत्राधीन । तैसा मी बोलेन । बोलविल्या ।।१४३।।
द्यावें अवधान । अहो संतजन । व्हावें कृपापूर्ण । मजवरी ।।१४४।।
साधूंचा अंकित । निरोप्या मी दूत । मज ते नटवोत । निजेच्छेनें ।।१४५।।
होवोनि प्रसन्न । तंव गुरुदेव । म्हणती प्रस्ताव । पुरे आतां ।।१४६।।
हें तों सर्व कांहीं । आम्हालागीं ठावें । न लगे बोलावें । ज्ञानदेवा ।।१४७।।
आम्ही तुजलागीं । दिलें वरदान । गीतार्थ-व्याख्यान । करी त्वरें ।।१४८।।
श्रीगुरु-वचन । ऐकोनि सादर । आनंद- [१] निर्भर । होवोनियां ।।१४९।।
म्हणे श्रोतयांस । निवृत्तीचा दास । ऐका सावकाश । कथाभाग ।।१५०।।

ॐनमो भगवते वासुदेवाय ।

धृतराष्ट्र उवाच–

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ।
मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत संजय ।।१।।

पुसे *धृतराष्ट्र । *संजयालागोनि । मोहित होवोनि । पुत्र-प्रेमें ।।१५१।।
म्हणे सांगें मज । जें का [२] धर्मालय । तेथें झालें काय । *कुरु-क्षेत्रीं ।।१५२।।
जेथें ते पांडव । आणि माझे पुत्र । मिळाले एकत्र । युद्धालागीं ।।१५३।।
एवढ्या वेळांत । परस्परें त्यांनीं । काय केलें झणीं । सांगें मज ।।१५४।।

संजय उवाच–

दृष्ट्वा तु पाण्डवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ।
आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ।।२।।

तिये वेळीं काय । संजय तो बोले । सैन्य उफाळलें । पांडवांचें ।।१५५।।
*कल्पांताच्या वेळीं । [३] कृतांताचें मुख । पसरावें देख । जैशा रीती ।।१५६।।
तैसें तें घनदाट । उठे एकवाट । जणूं काळकूट । उसळलें ।।१५७।।
किंवा *वडवाग्नि । पेटे अकस्मात । भेटे महा-वात । तों चि त्यासी ।।१५८।।
मग त्याच्या ज्वाला । शोषोनि सागरा । झोंबाव्या अंबरा। जैशा रीती ।।१५९।।
तैसा [४] दळ-भार । पाहतां [५] दुर्धर । भासला भेसूर । तिये काळीं ।।१६०।।

---

*परिशिष्ट पहा. १ भरलेला. २ पुण्यभूमि. ३ काळाचें. ४ सैन्यसमुदाय. ५ अडवण्यास कठिण.

ठाकतां सामोरा । हत्तींचा मेळावा । जैसा [1] उपेक्षावा । सिंहराजें ।।१६१।।
तैसा नाना [2] व्यूहीं । कौशल्यें रचिला । तुच्छ तो लेखिला । दुर्योधनें ।।१६२।।

पश्यैतां पाण्डुपुत्राणामाचार्य महतीं चमूम् ।
व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ।।३।।

राजा दुर्योधन । मग द्रोणापासीं । येवोनि तयासी । काय बोले ।।१६३।।
म्हणे देखिलें का । कैसें उभारलें । सैन्य उसळलें । पांडवांचें ।।१६४।।
वाटे [3] गिरि-दुर्ग । जणूं ते चालते । रचिले भोंवते । नाना व्यूह ।।१६५।।
राजा द्रुपदाचा । पुत्र *धृष्टद्युम्न । ज्यासी विद्या-दान । केलें तुम्हीं ।।१६६।।
तुमचा जो [4] तज्ञ । शिष्य असामान्य । तेणें चि हें सैन्य । उभारिलें ।।१६७।।

अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि ।
युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ।।४।।

तैसे चि विशेष । शस्त्रास्त्रीं प्रवीण । वीर जे निपुण । क्षात्र-धर्मीं ।।१६८।।
सामर्थ्य योग्यता । तेविं पराक्रम । भीमार्जुनांसम । असे ज्यांचा ।।१६९।।
तयांचीं हि नांवें । कौतुकें साचार । प्रसंगानुसार । सांगतों मी ।।१७०।।
महायोद्धा येथें । *सात्यकी *विराट । [5] महारथी श्रेष्ठ । द्रुपद हि ।।१७१।।

धृष्टकेतुश्चेकितानःकाशिराजश्च वीर्यवान्
पुरुजित्कुन्तिभोजश्च शैब्यश्च नरपुङ्गवः ।।५।।
युधामन्युश्च विक्रान्त उत्तमौजाश्च वीर्यवान् ।
सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ।।६।।

शूर चेकितान । आणि काशिराजा । वीर उत्तमौजा । धृष्टकेतु ।।१७२।।
शैब्यराजा तैसा । युधामन्यु पाहें । येथें आला आहे । कुंतिभोज ।।१७३।।
पुरुजितादिक । सकळ हे राजे । देखा हा विराजे । अभिमन्यु ।।१७४।।
जो प्रतिअर्जुन । सुभद्रेचा प्राण । द्रौपदी-नंदन । आणिक हि ।।१७५।।
ऐसे हे सकळ । महा-रथी वीर । असंख्य अपार । आले येथें ।।१७६।।

अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम ।

---

१ लक्ष देऊं नये.　२ विशिष्ट रचनेंत.　३ डोंगरी किल्ले.　४ माहितगार; कुशल.　५ मोठा योद्धा.
* परिशिष्ट पहा.

नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ॥७॥
भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजय:।
अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ॥८॥

आतां आमुचिया । सैन्याचे नायक । प्रख्यात सैनिक । भूमंडळीं ॥१७७॥
[1] प्रसंगें तयांचें । करितों वर्णन । कळावें म्हणोन । तुम्हांलागीं ॥१७८॥
सांगतों त्यांतील । मुख्य पांच सात । तुम्ही आधीं ज्यांत । नामवंत ॥१७९॥
तेजोनिधि जणूं । प्रतापाचा सूर्य । देखा भीष्माचार्य । गंगा-पुत्र ॥१८०॥
[2] रिपु-मतंगजा । जो का[3] पंचानन। शौर्यशाली कर्ण । तो हा येथें ॥१८१॥
एकला ह्यांतील । विश्व हि निर्मील । किंवा संहारील । मनोमात्रें ॥१८२॥
थोर धनुर्धर । येथें कृपाचार्य । पुरे ना हा काय । एकला चि ॥१८३॥
विकर्ण हा वीर । येथें अलीकडे । देखा पलीकडे । अश्वत्थामा ॥१८४॥
ज्याचें सदा वाटे । काळातें हि भय । तेविं समितिंजय । सौमदत्ति ॥१८५॥

अन्ये च बहव: शूरा मदर्थे त्यक्तजीविता: ।
नानाशस्त्रप्रहरणा: सर्वे युद्धविशारदा: ॥९॥

बहु आणिक हि । वीर जे सकळ । नेणे ज्यांचें बळ । विधाता हि ॥१८६॥
शस्त्रविद्येमाजीं । होती पारंगत । जे का [4]मूर्तिमंत । मंत्रविद्या ॥१८७॥
सर्व अस्त्रें झालीं । जेथोनियां रूढ । वीर जे अजोड । जगामाजीं ॥१८८॥
पराक्रमी पूर्ण । अर्पावया प्राण । सिद्ध प्रतिक्षण । माझ्यासाठीं ॥१८९॥
पतिव्रतेचा तों । पतिपायीं भाव । तैसें मी सर्वस्व । वीरांसी ह्या ॥१९०॥
आपुलें जीवित । लेखिती थोकडें । जे का कार्यापुढें । आमुचिया ॥१९१॥
ऐसे स्वामीभक्त । नि:सीम उत्तम । युद्धकला– [5]मर्म । जाणती जे ॥१९२॥
कलेसी कीर्तीसी । होती जे जीवन । जन्मला जेथून । क्षात्रधर्म ॥१९३॥
सर्वांगें संपूर्ण । ऐसे असंख्यात । आमुच्या सैन्यांत । वीर येथें ॥१९४॥

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम्
पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥१०॥

---

१ ओघानें. २ शत्रुरूपी हत्तीला. ३ सिंह. ४ प्रत्यक्ष. ५ खुबी.
* परिशिष्ट पहा.

सर्व हि क्षत्रियां–। माजीं जो वरिष्ठ । जगीं योद्धा श्रेष्ठ । भीष्माचार्य ॥१९५॥
तयालागीं मुख्य । सेनापति केलें । अधिकार दिले । सर्व हि ते ॥१९६॥
आपुल्या सामर्थ्यें । आवरोनि सेना । उभारी हा नाना । दुर्ग जैसे ॥१९७॥
ह्याजपुढें काय । त्रैलोक्याचा [१] पाड । मज हें उघड । दिसे येथें ॥१९८॥
समुद्र तों पाहें । आधीं चि [२] दुस्तर । वडवाग्नि भर । देई त्यासी ॥१९९॥
किंवा काळाग्नीतें । मिळे महा-वात । तैसा गंगा-सुत । सेनापति ॥२००॥
ऐशा ह्या सैन्याशीं । झुंजवेल कोणा । पांडवांची सेना । दिसे थोडी ॥२०१॥
आडदांड भीम । पहा सेना-नाथ । बोलोनि हें स्वस्थ । राहिला तो ॥२०२॥

अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिता: ।
भीष्ममेवाभिरक्षन्तु भवन्त: सर्व एव हि ॥११॥

सर्व सेनापती । आपुले पाहोन । पुन्हां दुर्योधन । काय बोले ॥२०३॥
म्हणे झुंजावया । सिद्ध व्हा सकळ । आपुलालें [३] दळ । सज्ज करा ॥२०४॥
ज्यांच्यापाशीं ज्या ज्या । होती *अक्षौहिणी । त्या त्या येथें रणीं । विभागाव्या ॥२०५॥
वरी अधिकारी । जो जो महारथी । तेणें तयांप्रति । आवरोनि ॥२०६॥
रहावें सर्वांनीं । भीष्माच्या आज्ञेंत । जाणोनि तो श्रेष्ठ । सर्वांमाजीं ॥२०७॥
मग पुन्हां ऐसें । बोले द्रोणापासीं । संरक्षावें ह्यासी । तुम्ही आतां ॥२०८॥
सर्वभावें ह्यातें । माझ्या ठायीं माना । सैन्या साचपणा । ह्याच्या योगें ॥२०९॥

तस्य संजनयन्हर्षं कुरुवृद्ध: पितामह:
सिंहनादं विनद्योच्चै: शङ्खं दध्मौ प्रतापवान् ॥१२॥

ऐकोनि हे बोल । भीष्म संतोषला । मग तेणें केला । सिंहनाद ॥२१०॥
दोन्हीं दळांमाजीं । नाद तो अद्भुत । मावे ना नभांत । प्रतिध्वनि ॥२११॥
त्या चि प्रतिध्वनि–। सवें वीरश्रीनें । वाजविला तेणें । दिव्य शंख ॥२१२॥
मिळतां ते दोन्ही । नाद तिये काळीं । [४] बधिरता आली । त्रैलोक्यासी ॥२१३॥
वाटे तुटोनियां । आकाशाचा प्रांत । जणूं धडाडत । आला खालीं ॥२१४॥
[५] क्षोभे चराचर । कांपावया लागे । उसळले वेगें । महा-सिंधू ॥२१५॥

---

१ किंमत.　२ तरून जाण्यास कठिण.　३ सैन्य.　४ बहिरेपणा.　५ खवळून गेले.
* परिशिष्ट पहा.

झाला महा-घोष । तयाच्या गजरें । पर्वत-[1] कंदरें । दणाणलीं ।।२१६।।

ततः शङ्खाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः।
सहसैवाभ्यहन्यन्त स शब्दस्तुमुलोऽभवत् ।।१३।।

तों चि रणवाद्यें । रणांत उदंड । गर्जतां प्रचंड । घोष झाला ।।२१७।।
महा-भयानक । कर्णकटु ध्वनि । ऐकोनि तो रणीं । एकाएकीं ।।२१८।।
योद्धे धीट धीट। त्यांस हि केवळ । वाटे अंतकाळ । ओढवला ।।२१९।।
[2] भेरी डंके ढोल । शंख झांजा कर्णे । [3] घोर ओरडणें । योद्ध्यांचें हि ।।२२०।।
थोपटिती बाहू । कोणी आवेशून । कोणी चवताळून । देती हांका ।।२२१।।
झाले अनावर । हत्ती मदोन्मत्त । काय सांगूं [4] मात । [5] भेकडांची ।।२२२।।
होते ढिले जे का । गेले ते उडोन । कस्पटासमान । क्षणार्धांत ।।२२३।।
तेथें उभा राहूं । शके ना कृतांत । झाला भयभीत । महा-घोषें ।।२२४।।
उभेपणीं प्राण । गेले कित्येकांचे । पावले धीराचे । ते हि कंप ।।२२५।।
धैर्यवंतांची हि । बसे दांतखीळ । जाहला व्याकूळ । ब्रह्मा तो हि ।।२२६।।
देखोनि आकांत। देव हि स्वर्गांत। बोलती कल्पान्त। आला आजि।।२२७।।
ऐके राया आतां । काय झाली मात। तेथें त्या सैन्यांत । पांडवांच्या ।।२२८।।

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते महति स्यन्दने स्थितौ ।
माधवः पाण्डवश्चैव दिव्यौ शङ्खौ प्रदध्मतुः ।।१४।।
पाञ्चजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनञ्जयः ।
पौण्ड्रं दध्मौ महाशङ्खं भीमकर्मा वृकोदरः ।।१५।।
अनन्तविजयं राजा कुन्तीपुत्रो युधिष्ठिरः ।
नुकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ।।१६।।

महा-तेजाचें का । असे जें भांडार । मूर्तिमंत सार । विजयाचें ।।२२९।।
गरुडासारिखे । वेगवंत चार । जोडिले साचार । [6] वारू ज्यातें ।।२३०।।
ऐसा रथ-श्रेष्ठ । दिसे शोभिवंत । दिव्य पंखयुक्त । * मेरु जैसा ।।२३१।।
ज्याच्या तेजें दिशा । कोंदाटल्या दाही । स्वयें घोडे वाही । पार्थाचे जो ।।२३२।।

---

१. गुहा. २ वाद्यविशेष. ३ भयंकर. ४ गोष्ट. ५ भित्र्यांची. ६ घोडे.
* परिशिष्ट पहा.

देव तो श्रीहरी । ज्या रथीं सारथी । वानूं गुण किती । रथाचे त्या ॥२३३॥
ध्वज-स्तंभीं[१] साक्षात् । शिव-अवतार । मारुती साचार । बैसलासे ॥२३४॥
देखा विलक्षण । कैसें भक्त-प्रेम । सारथ्याचें काम । देव करी ॥२३५॥
आपुला सेवक । घालोनियां पाठीं । पुढें जगजेठी । उभा राहे ॥२३६॥
तेणें कृष्णनाथें । लीलेनें आपुला । शंख तो फुंकिला । पांचजन्य ॥२३७॥
सूर्योदयीं जैसा । नक्षत्रांचा लोप । होय आपोआप । नभामाजीं ॥२३८॥
तैसा कौरवांच्या । दळीं सभोंवार । वाद्यांचा गजर । चालिला जो ॥२३९॥
कळे ना तो कोठें । लोपला सत्वर । तेणें घनघोर । [२]महा-घोषें ॥२४०॥
मग पार्थे तेथ । शंख देवदत्त । वाजवितां होत । महा-नाद ॥२४१॥
दोन्ही हि ते ध्वनी । मिळतां अद्भुत । ब्रह्मांड [३]शतकूट । होऊं पाहे ॥२४२॥
तों चि महाकाळा-। सारिखा [४]क्षोभून । उठे भीमसेन । आवेशानें ॥२४३॥
पौंड्र महा-शंख । फुंकिला तयानें । जैसा का दणाणे । काळ-मेघ ॥२४४॥
मग धर्मराज । वाजविता होय । अनंतविजय । शंख थोर ॥२४५॥
नकुळें सुघोष । तो मणि-पुष्पक । वाजविला शंख । सहदेवें ॥२४६॥
प्रचंड गंभीर । ऐकोनि तो ध्वनि । गेला घाबरोनि । काळ तो हि ॥२४७॥

काश्यश्च परमेष्वासः शिखण्डी च महारथः ।
धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥१७॥
द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते ।
सौभद्रश्च महाबाहुः शङ्खान्दध्मुः पृथक् पृथक् ॥१८॥
स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् ।
नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥१९॥

पांडवाच्या [५]दळीं । भूपती अनेक । द्रौपदेयादिक । आणिक जे ॥२४८॥
महाबाहु काश्य । द्रुपद तो तेथ । अर्जुनाचा सुत । अभिमन्यु ॥२४९॥
सात्यकी अजिंक्य । *शिखंडी विराट । तैसा नृपनाथ । धृष्टद्युम्न ॥२५०॥
ऐसे थोर वीर । सैनिक प्रमुख । त्यांनीं नाना शंख । वाजविले ॥२५१॥

---

१ मूर्तिमंत. २ मोठ्या आवाजानें. ३ शेकडो तुकडे झालेलें. ४ खवळून. ५ सैन्यात.
* परिशिष्ट पहा.

प्रचंड तो घोष । दणाणतां तेथ । बैसला [१] आघात। एकाएकीं ।।२५२।।
तेणें * शेष-कूर्म । दचकोनि जाती । सोडाया पहाती । भू-भारातें ।।२५३।।
मेरु-मंदराचा । जाऊं पाहे झोंक । घोषें तिन्ही लोक । हादरतां ।।२५४।।
भिडे कैलासातें । सागराचें जळ । वेगें मही-तळ । ढळूं पाहे ।।२५५।।
वाटे आकाशातें । बैसोनि हिसडा । होऊं पाहे सडा । नक्षत्रांचा ।।२५६।।
सत्यलोकीं झाली । एक चि आरोळी । पहा गेली गेली। सृष्टि आज! ।।२५७।।
आतां सारे देव । झाले निराधार । उठे हाहाकार । तिन्ही लोकीं ।।२५८।।
असोनि दिवस । लुप्त झाला भानु । वाटे आला जणूं । प्रळयान्त ।।२५९।।
[२] आदिपुरुष हि । होवोनि विस्मित । म्हणे न हो अंत । ब्रह्मांडाचा ।।२६०।।
म्हणोनियां विश्व । सांवरलें तेथ । लोपोनि अद्भुत । आवेश तो ।।२६१।।
एऱ्हवीं * युगान्त । होता ओढवला । जेव्हां घोष केला । कृष्णादिकीं ।।२६२।।
महा-शंखांचा तो । ओसरला नाद । परी पडसाद । ठेला त्याचा ।।२६३।।
तेणें पडसादें । झाली दाणादाण । सैनिकांची जाण । कौरवांच्या ।।२६४।।
महा-वनीं जैसा । हत्तींचा समूह । [३] विदारितो सिंह । लीलामात्रें ।।२६५।।
तैसा चि तो तेथें । गेला प्रतिध्वनि । हृदयें भेदोनि । कौरवांचीं ।।२६६।।
घोर प्रतिध्वनि । ऐकोनि तो कोणी । गेले उभेपणीं । गळोनियां ।।२६७।।
म्हणोनियां देती । एकमेकां साद । व्हा रे व्हा सावध । बोलती ते ।।२६८।।

अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान्कपिध्वजः ।
प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पाण्डवः ।।२०।।

प्रतिष्ठा-संपन्न । बळी जे सुधीर । महारथी वीर । होते तेथें ।।२६९।।
आवरोनि त्यांनीं । सैन्य आपुलालें । पुन्हां सज्ज केलें । झुंजावया ।।२७०।।
उठावलें तेव्हां । [४] दुण्या आवेशानें । [५] क्षुब्ध झालें तेणें । * लोक-त्रय ।।२७१।।
बाणांचा वर्षाव । करिती ते वीर । जैसे जल-धर । * प्रलयान्तीं ।।२७२।।
देखोनियां तेथें । अखंड ती वृष्टी । तोष झाला चित्तीं । अर्जुनाच्या ।।२७३।।
मग जों [६] सावेश । करी निरीक्षण । देखे कुरु-जन । आघवा चि ।।२७४।।

---

१ तडाखा. २ ईश्वर. ३ फोडतो. ४ दुप्पट. ५ खवळलेलें. ६ आवेशानें.
* परिशिष्ट पहा.

झुंजावया [१] सिध्द । पाहोनियां तेथें । सज्ज केले पार्थें । [२] चाप-बाण ॥२७५॥
लीलेनें ते तैसे । घेवोनियां हातीं । मग कृष्णाप्रति । काय बोले ॥२७६॥

हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ।
अर्जुन उवाच -
सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥२१॥

यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान् ।
कैर्मया सह योद्धव्यमस्मिन् रणसमुद्यमे ॥२२॥

योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागता: ।
धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षव: ॥२३॥

म्हणे सर्वांतून । कोणाशीं झुंजावें । लागे हें पहावें । म्हणोनियां ॥२७७॥
दोन्ही सैन्यामाजीं । नेवोनि त्वरित । देवा माझा रथ । उभा करीं ॥२७८॥
जोंवरी हे सर्व । वीर धीट धीट । क्षणभरी नीट । [३] न्याहाळीन ॥२७९॥
बहु उतावीळ । दुष्ट हे कौरव । झुंजायाची हांव । बाळगिती ॥२८०॥
नाहीं रणीं धैर्य । नाहीं पराक्रम । आवडे [४] संग्राम । परी ह्यांतें ॥२८१॥
रायालागीं ऐसा । सांगोनि [५] वृत्तांत । संजय तो तेथ । काय बोले ॥२८२॥

संजय उवाच–
एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत ।
सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥२४॥

भीष्मद्रोणप्रमुखत: सर्वेषां च महीक्षिताम् ।
उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति ॥२५॥

तत्रापश्यत्स्थितान्पार्थ : पितॄनथ पितामहान् ।
आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा ॥२६॥

श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि ।
तान्समीक्ष्य स कौन्तेय: सर्वान्बन्धूनवस्थितान् ॥२७॥

कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत्

---

१ तयार. २ धनुष्यबाण. ३ निरखून पाहीन. ४ लढाई. ५ हकीकत.
* परिशिष्ट पहा.

म्हणे राया ऐकें । ऐशा परी पार्थें । सांगतां श्रीकांतें । काय केलें ।।२८३।।
चालविला रथ । हांकवोनि [१]वाजी । दोन्हीं सैन्यामार्जी । उभा केला ।।२८४।।
भीष्म -द्रोणादिक । जेथें आप्तजन । आणि भूप-गण । पुढें उभा ।।२८५।।
थांबवोनि रथ । तेथें धर्नुधर । पाहे दळभार । उत्कंठेनें ।।२८६।।
मग म्हणे देवा । येथें पाहें पाहें । [२]गोत्र-गुरु ना हे । सकळ हि ।।२८७।।
ऐकोनि हे बोल । कृष्णदेवराय । पावोनि विस्मय । क्षणभरी ।।२८८।।
मनीं म्हणे येथें । पार्थ धनुर्धारी । ऐसें काय करी । कोण जाणे ! ।।२८९।।
परि कांहीं तरी । दिसे विलक्षण । सहजें लक्षून । भवितव्य ।।२९०।।
कृष्ण तो सर्वज्ञ । प्रभु हृदयस्थ । उगा राहे स्वस्थ । तिये काळीं ।।२९१।।
तों चि पार्थें तेथें । देखिले सकळ । गुरु बंधु [३] मातुल । आजे काके ।।२९२।।
आप्त इष्ट मित्र । देखिले कुमार । सर्व परिवार । आपुला चि ।।२९३।।
मुलें नातू सखे । आणिक सोयरे । देखिले सासरे । स्नेहीजन ।।२९४।।
संरक्षिलें होतें । जयां विपत्तींत । किंवा उपकृत । केलें ज्यांसी ।।२९५।।
असो ऐसे सर्व । वडील धाकुले । तेथें सज्ज झाले । झुंजावया ।।२९६।।
दोहीं दळीं ऐसें । आपुलें चि गोत । देखोनियां तेथ । तिये वेळीं ।।२९७।।
पार्थाचिया मनीं । झाली गजबज । करुणा सहज । उपजली ।।२९८।।
तेणें अपमानें । देखा वीर-वृत्ति । गेली तयाप्रति । सोडोनियां ।।२९९।।
कुलीन सुरूप । सद्गुणी ललना । तेजें [४]साहती ना । सवतीतें ।।३००।।
रंगला नूतनीं । जैसा कामीजन । जाय विसरोन । निजपत्नी ।।३०१।।
न पाहे योग्यता । घेतां तिचा छंद । होय मति-मंद । वेडावला ।।३०२।।
तपोबळें किंवा । प्राप्त होतां ऋद्धि । भ्रंशोनियां बुद्धि । तापसाची ।।३०३।।
मग तया जैसी । नाठवे विरक्ति । तैसी झाली स्थिति । अर्जुनाची ।।३०४।।
तयाचें हृदय । कारुण्यें ग्रासिलें । म्हणोनि लोपलें । [५] पौरुष तें ।।३०५।।
मांत्रिकासी जैसें । झपाटितें भूत । जरी चुकी होत । मंत्रोच्चारीं ।।३०६।।
तैसा [६] महामोहें । ग्रासिला तो वीर । म्हणोनियां धीर । गेला त्याचा ।।३०७।।

---

१. घोडे. २ कुळ व वडील माणसें. ३ मामा. ४ सहन करीत नाहीं. ५ पराक्रम. ६ मायेनें.
* परिशिष्ट पहा.

देखा चंद्रकला । स्पर्शतां क्षणांत । मणि *चंद्रकांत । द्रवे जैसा ॥३०८॥
तैसें अतिस्नेहें । द्रवतां हृदय । [१] खिन्न धनंजय । काय बोले ॥३०९॥

अर्जुन उवाच–

दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ॥२८॥
सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ।
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥२९॥
गाण्डीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते ।
न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मन: ॥३०॥

म्हणे ऐकें देवा । पाहिला मेळावा । दिसे हा आघवा । गोत्रवर्ग ॥३१०॥
कराया संग्राम । सर्व हे [२] उद्युक्त । परी तें उचित । नव्हे आम्हां ॥३११॥
काय नेणों कैसें । गेलें अवसान । माझें मज भान । नुरे आतां ॥३१२॥
ह्यांसवें लढावें । नको हा विचार । मन बुध्दि स्थिर । ठायीं नोहे ॥३१३॥
देखें देहीं [३] कंप । जिह्वा झाली जड । तोंडासी कोरड । पडे माझ्या ॥३१४॥
थरारे सर्वांग । जणूं घेई पेट । [४] विकलता येत । गात्रांलागीं ॥३१५॥
पाहें ढिला होतां । गाण्डीवाचा हात । ठरे ना तें तेथ । पडे खालीं ॥३१६॥
कळे ना तें केव्हां । गळोनियां गेलें । हृदय व्यापिलें । मोहें ऐसें ॥३१७॥
होतें *वज्राहून । विशेषें दारुण । दुर्धर कठिण । पार्थ-चित्त ॥३१८॥
परी तयाहून । *माया [५] दुर्निवार । देखा कैसें थोर । नवल हें ! ॥३१९॥
जेणें युध्दामाजीं । शंकरासी हार । आणिली साचार । तो हा वीर ॥३२०॥
*निवात-कवच । दैत्य केले ठार । क्षणीं तो जर्जर । झाला मोहें ॥३२१॥
भलतैसें काष्ठ । शुष्क कठिणांग । भेदीतसे भृंग । लीलेनें चि ॥३२२॥
परी कोंडे जेव्हां । कोंवळ्या कळींत । गुंतोनियां तींत । पडे जैसा ॥३२३॥
म्हणे चिरूं कैसी । पद्माची पाकळी । तेथें देई बळी । प्राणाचा हि ॥३२४॥
तैसा स्नेह-बंध । अति हळुवार । म्हणोनि साचार । तोडवे ना ॥३२५॥
आदिपुरुषाची । अगम्य ही माया । नये [६] आकळाया । ब्रह्म्यातें हि ॥३२६॥

---

१ कष्टी. २ तयार. ३ कांपरें. ४ व्याकुळपणा. ५ दूर करण्यास कठिण. ६ जाणून घेण्याला.
* परिशिष्ट पहा.

२

त्या चि मायायोगें । भुले धनंजय । रायासी संजय । सांगतसे ॥३२७॥
ऐकें राजा रणीं । ऐसा तो अर्जुन । देखोनि स्व-जन । सकळ हि ॥३२८॥
युध्दाचा आवेश । विसरला तेथ । कैसें नेणों चित्त । पाझरलें ॥३२९॥
मग म्हणे कृष्णा । नये राहूं येथें । ऐसें मनीं येतें । वारंवार ॥३३०॥
सकळ स्व-जन । मारावे हे ठार । मज हा विचार । साहवे ना ॥३३१॥
मन माझें फार । होतसे व्याकुळ । सुटे आतां तोल । वाचेचा हि ॥३३२॥

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव ।
न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ॥३१॥

कौरवांचा वध । जरी वाटे चांग । न मारूं कां सांग । धर्मादिकां ॥३३३॥
आम्ही आप्तजन । सर्व हि [१]निभ्रांत । एक चि ना गोत । एकमेकां ॥३३४॥
म्हणोनियां देवा । जळो जळो झुंज । माने ना हें मज । कांहीं केल्या ॥३३५॥
महा-पातकाचा । कां गा व्हावें धनी । दिसे मज हानि । सर्वस्वाची ॥३३६॥
ऐसें वाटे आतां । टाळिली लढाई । तरी आशा कांहीं । कल्याणाची ॥३३७॥

न काङ्क्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ।
किं नो राज्येन गोविन्द किं भोगैर्जीवितेन वा ॥३२॥
येषामर्थे काङ्क्षितं नो राज्यं भोगा : सुखानि च ।
त इमेऽवस्थिता युध्दे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ॥३३॥
आचार्या: पितर: पुत्रास्तथैव च पितामहा: ।
मातुला: श्वशुरा: पौत्रा: श्याला: सम्बन्धिनस्तथा ॥३४॥

देखोनि हें मज । नको नको जय । राज्य तरी काय । कशासाठीं ॥३३८॥
वधोनि हे सर्व । भोगावे जे भोग । लागो तयां आग । पार्थ बोले ॥३३९॥
ऐशा [२]भोगाभावीं । कैसी हि [३]आपदा । येवो ती गोविंदा । साहवेल ॥३४०॥
पुढें उभे कोण । गुरु भीष्म-द्रोण । सुखें [४]वेचूं प्राण । ह्यांच्यासाठीं ॥३४१॥
वधोनियां ह्यांतें । घ्यावें राज्य-सुख । स्वप्नांत हि देख । इच्छूं ना हें ॥३४२॥
कां गा जन्मा यावें । जगावें [५]किमर्थ । जरी चिंतूं घात । वडिलांचा ॥३४३॥

---

१. नक्कीच. २ सुख उपभोगण्याऐवजी. ३ कष्टाची स्थिति. ४ खर्च करूं. ५ कशाकरितां ?
* परिशिष्ट पहा.

कुळीं ह्याचिसाठीं । इच्छिती का पुत्र । कीं तयें स्व-गोत्र । [1] निर्दाळावें ।।३४४।।
मनीं तरी कां हा । आणावा विचार । कां व्हावें कठोर । वज्राऐसें ।।३४५।।
घडे तरी घडो । ह्यांचें कांहीं हित । वागणें [2] उचित । हें चि आम्हां ।।३४६।।
जें जें कांहीं आम्ही । [3] संपादावें येथें । उपभोगावें तें । सर्वांनीं च ।।३४७।।
जरी ह्यांच्या काजीं । वेंचलें जीवित । तरी त्यांत हित । [4] सर्वथैव ।।३४८।।
[5] दिगंतींचे राजे । जिंकोनि सकळ । तोषवावें कुळ । आपुलें जें ।।३४९।।
परी कर्म-गति । कैसी विपरीत । तें चि आलें येथ । झुंजावया ।।३५०।।
स्त्रिया मुलें सर्व । सांडोनि भांडार । शस्त्राग्रीं जिव्हार । ठेवोनियां ।।३५१।।
पाहें झाले सज्ज । लढावया आज । ऐसे हे गोत्रज । आमुचे चि ।।३५२।।
देवा तूं चि सांग । ह्यांसी कैसें मारूं । कोणावरी धरूं । शस्त्र आतां ।।३५३।।
आपुला आपण । करावा का घात । असे हें उचित । काय आम्हां ? ।।३५४।।
लढावया आले । जाणसी ना कोण । देखें भीष्म-द्रोण । पलीकडे ।।३५५।।
आम्हांवरी ज्यांचे । थोर उपकार । कैसें करूं ठार । तयांलागीं ।।३५६।।
सासरे मेहुणे । आणि हे मातुल । बांधव सकल । आमुचे चि ।।३५७।।
पुत्र नातू आप्त । सोयरे समस्त । संबंध निकट । एकमेकां ।।३५८।।
करूं वध ह्यांचा । ऐसें बोले वाचा । तरी हि तयाचा । दोष लागे ।।३५९।।

एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ।
अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते ।।३५।।

ह्याहिवरी हे तों । हवें तें करोत । आतां चि मारोत । आम्हांलागीं ।।३६०।।
परी आम्हीं ह्यांचा । कदापि निःपात । न चिंतावा येथ । मनानें हि ।।३६१।।
त्रिलोकींचें राज्य । सर्व झालें प्राप्त । तरी अनुचित । [6] नाचरें हें ।।३६२।।
मनीं कोणाच्याहि । नुरेल आदर । जरी ऐसें घोर । कृत्य केलें ।।३६३।।
तुझें मुख कैसें । दिसेल आम्हांसी । जरी आम्हीं ह्यांसी । घात चिंतूं ।।३६४।।

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन ।
पापमेवाऽऽश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः ।।३६।।

---

१ नष्ट करावें.　२ योग्य.　३ मिळवावें.　४ पूर्णपणें.　५ सर्व बाजूंचे.　६ करणार नाही.

गोत्रजांचा घात । घडेल हातून । तरी मी ठरेन । पाप-राशि ॥३६५॥
महा-पुण्यें घेसी । आमुचा कैवार । तो तूं आम्हां दूर । होशील कीं ॥३६६॥
कुलाचा संहार । होतां चि [१] अशेष । जडतील दोष । आम्हांलागीं ॥३६७॥
तिये वेळीं मग । तुज देवराया । आम्ही कोणे ठायां । शोधावें गा ? ॥३६८॥
उपवनीं अग्नि । देखोनि प्रबळ । क्षण ना कोकिळ । राहे तेथें ॥३६९॥
[२] कर्दमें भरलें । देखे सरोवर । तरी तें चकोर । त्यजी जेवीं ॥३७०॥
तया परी मातें । सोडिशील देवा । पुण्याचा ओलावा । संपतां चि ॥३७१॥
घालोनियां मातें । मायेची [३] भुरळ । दूर तूं जाशील । ठकवोनि ॥३७२॥

तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान्स्वबान्धवान् ।
स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ॥३७॥

नाना परी वाटे । [४] सदोष हें कर्म । ना करीं संग्राम । ह्यांच्या संगें ॥३७३॥
आम्हांलागीं तुझा । होतां चि [५] वियोग । काय उरे मग । सांगें कृष्णा ॥३७४॥
कौरवांचा घात । करावा भोगार्थ । घडे ना ही मात । पार्थ म्हणे ॥३७५॥

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः ।
कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम् ॥३८॥
कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् ।
कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥३९॥

जरी अभिमानें । होवोनि उन्मत्त । ठाकले युध्दार्थ । कौरव हे ॥३७६॥
तरी लागे आम्हां । पहावें स्व-हित । ऐसें माझें मत । भगवंता ॥३७७॥
वधावे हे कैसे । आपुले आप्तेष्ट । घ्यावें [६] कालकूट । जाणतां चि ॥३७८॥
अहो मार्गीं ठाके । सिंह अकस्मात । चुकवितां हित । नोहे काय ? ॥३७९॥
असता प्रकाश । सांडोनियां दूर । सेवितां अंधार । काय लाभ ? ॥३८०॥
भडकला अग्नि । देखोनि समोर । नाहीं झालों दूर । तेथोनियां ॥३८१॥
तरी आपणातें । जैसा तो घेरून । टाकील जाळून क्षणामाजीं ॥३८२॥
तैसे महादोष । येथें मूर्तिमंत । आदळूं पहात । अंगावरी ॥३८३॥

---

१ पूर्णपणें. २ चिखलानें. ३ भूल. ४ दोषयुक्त. ५ ताटातूट. ६ तीव्र विष.

जाणोनि कां व्हावें । युध्दासी [१] प्रवृत्त । कृष्णाप्रति पार्थ । ऐसें बोले ।।३८४।।
म्हणे देवा आतां । ऐकावी सर्वथा । [२] महाभीषणता । पापाची ह्या ।।३८५।।

कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः ।
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ।।४०।।

काष्ठावरी होतां । काष्ठाचें घर्षण । उपजे त्यांतून । अग्नि जो का ।।३८६।।
होतां तो प्रदीप्त । जैसे काष्ठजात । जाळोनि टाकीत । समस्त हि ।।३८७।।
तैसा गोत्रीं वध । होतां परस्पर । तेणें दोषें घोर । कुलक्षय ।।३८८।।
होतां कुलक्षय । लोपे कुलधर्म । संचरे अधर्म । कुळामाजीं ।।३८९।।

अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यन्ति कुलस्त्रियः ।
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ।।४१।।

मग सारासार । राहे ना विचार । कळे ना साचार । योग्यायोग्य ।।३९०।।
[३] कर्तव्याकर्तव्य । ओळखे ना कांहीं । ऐसी दशा होई । पापें येणें ।।३९१।।
मालवोनि दीप । चालतां अंधारीं । उजू मार्ग तरी । लागे ठेंच ।।३९२।।
कुलक्षयीं तैसा । आद्यधर्म सरे । एकलें चि उरे । पाप मात्र ।।३९३।।
मग तेथें मन । राहे ना स्वाधीन । * दशेंद्रियगण । [४] स्वैर वागे ।।३९४।।
हीन पुरुषाशीं । घडोनि संगति । तेणें बिघडती । कुलस्त्रिया ।।३९५।।
ऐसे वर्णावर्ण । जातां मिसळोन । लोपती संपूर्ण । ज्ञातिधर्म ।।३९६।।
चव्हाट्यावरील । भक्षावया अन्न । कावळे धांवोन । येती जैसे ।।३९७।।
तैसीं महा-पापें । संचरती कुळीं । लोपे जिये वेळीं । कुल-धर्म ।।३९८।।

संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ।
पतन्ति पितरो ह्येषां लुप्तपिण्डोदकक्रियाः ।।४२।।

तया [५] कुलघ्नांच्या । सर्वे त्या कुळास । सर्वां घडे वास । नरकींच ।।३९९।।
वंशांतील प्रजा । पावे अधोगति । पूर्वज भ्रष्टती । स्वर्गांतील ।।४००।।
लोपतां तीं कर्मे । नित्य नैमित्तिक । अर्पी तिळोदक । कोणा कोण ।।४०१।।
कोठोनि तयांसी । मग स्वर्ग-वास । सर्वें नरकास । ते हि जाती ।।४०२।।

---

१ तयार. २ भयंकरपणा. ३ करण्यास योग्य व अयोग्य. ४ मोकाट. ५ कुलघातक्यांच्या.

जरी सर्पें केला । नखाग्रातें [1] दंश । वेगें चढे विष । सर्वांगातें ।।४०३।।
तैसे सत्यलोका– । पासोनि सत्वर । सर्व हि पितर । भ्रष्ट होती ।।४०४।।

दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः ।
उत्साद्यन्ते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ।।४३।।
उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ।
नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ।।४४।।
अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् ।
यद्राज्यसुखलोभेन हन्तुं स्वजनमुद्यताः ।।४५।।

ऐकें देवा आतां । आणिक हि एक । भीषण पातक । घडे येथें ।।४०५।।
कीं ह्या कुलघ्नांची । घडतां संगति । तेणें लोकरीती । नाश पावे ।।४०६।।
गृहीं एकाएकीं । [2] उफाळला अग्नि । टाकितो जाळोनि । आणिकांसी ।।४०७।।
तैसा कुलघ्नांचा । जयां सहवास । तयांचा हि नाश । होय तेणें ।।४०८।।
नाना दोषें [3] व्याप्त । होतां चि तें कुळ । [4] दारुण केवळ । नरक भोगी ।।४०९।।
मग कल्पांतीं हि । सुटे ना त्यांतून । एवढें पतन । कुल-क्षयीं ।।४१०।।
नाना परी आम्हीं । आलों हें ऐकत । उपजे ना खंत । अजूनि हि ।।४११।।
सांगें देवा आतां । येथें कैसें मन । करावें कठीण । वज्राऐसें ।।४१२।।
जयालागीं राज्य-। सुख [5] अपेक्षावें । तें तरी स्वभावें । नाशिवंत ।।४१३।।
देवा जाणतां हि । ऐसे महादोष । आम्हीं कां निःशेष । त्यजावे ना ।।४१४।।
येथें हे सकळ । आपुले वडील । वधाया केवळ । पाहिले जे ।।४१५।।
हें चि काय थोडें । घडलें पातक । आतां [6] निरर्थक । जगावें कां ।।४१६।।

यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः ।
धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ।।४६।।

होवोनि निःशस्त्र । सुखें ह्यांचे बाण । करावे सहन । हें चि बरें ।।४१७।।
ऐशा परी मृत्यु । आला तरी चांग । परी नको संग । पापाचा ह्या ।।४१८।।
मग बोले पार्थ । देखोनि स्व-कुळ । राज्य तें केवळ । नरक-भोग ।।४१९।।

---

१ चावा. २ भडकला. ३ भरलेलें. ४ भयंकर. ५ इच्छावें. ६ व्यर्थ.

संजय उवाच-

एवमुक्त्वाऽर्जुन: संख्ये रथोपस्थ उपाविशत् ।
विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानस: ।।४७।।

इति श्रीमद्‌भगवद्‌गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे ।
श्रीकृष्णार्जुनसंवादे अर्जुनविषादयोगो नाम ।
प्रथमोऽध्याय: ।।१।।

**ऐकें राया रणीं । बोलिला जें पार्थ । तें चि तुज येथ । सांगितलें ।।४२०।।**
**मग तो अर्जुन । खिन्न झाला फार । आला [१] गहिंवर । आवरे ना ।।४२१।।**
**रथांतूनि तेव्हां । उतरोनि खालीं । दु:खें अश्रु गाळी । ढळढळां ।।४२२।।**
**जैसा राजपुत्र । होतां पदच्युत । कोणी ना ठेवित । मान त्याचा ।।४२३।।**
**नातरी राहूनें । टाकितां ग्रासून । दिसे प्रभाहीन । भानु जैसा ।।४२४।।**
**किंवा *सिध्दीलागीं । भुलोनि तापसी । [२] कामनेच्या [३] फांसीं । दीन होय ।।४२५।।**
**तैसा दु:खभारें । जाहला जर्जर । रणांगणीं वीर । धनंजय ।।४२६।।**
**मग धनुर्बाण । ठेवोनि [४] परते । बैसोनियां तेथें । अश्रु ढाळी ।।४२७।।**
**ऐशा परी रणीं । घडलें जें काय । रायासी संजय । तें चि सांगे ।।४२८।।**
**खिन्न अर्जुनासी । आतां कृष्णनाथ । कैसा * परमार्थ । [५] निरूपील ।।४२९।।**
**ती च कथा पुढें । ऐका [६] अभिनव । म्हणे ज्ञानदेव । निवृत्तीचा ।।४३०।।**

। इति श्री स्वामी स्वरूपानंदविरचित श्रीमत् अभंग-ज्ञानेश्वरी
प्रथमोऽध्याय: ।

हरये नम: । हरये नम: । हरये नम: ।
श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

१ हुंदका.  २ वासनेच्या.  ३ जाळ्यांत.  ४ बाजूला.  ५ सांगेल.  ६ अपूर्व.
* परिशिष्ट पहा.

दि. ८-४-२००७

# अभंग ज्ञानेश्वरी - २००७

## प्रथम प्रूफ

| | | |
|---|---|---|
| पूर्वार्ध : | सुरुवातीची पाने | |
| | अध्याय १ ते १२ | = एकूण ३२४ पाने |
| उत्तरार्ध : | अध्याय १३ ते १८ | = एकूण १९९ पाने. |
| | | = एकूण ५२३ पाने |

## द्वितीय प्रूफ

| | | |
|---|---|---|
| पूर्वार्ध : | अध्याय १ ते १२ | = एकूण २७ पाने. |
| उत्तरार्ध : | अध्याय १३ ते १८ | = एकूण ३९ पाने. |
| | | = एकूण ४६ पाने |